# प्रश्नसंच – सत्र ६ पेपर ८

'थांबा रामराज्य येतंय' हे दलित रंगभूमीवरील नाटक कोणी लिहिले होते?

अ. संजय पवार
ब. प्रेमानंद गज्वी
क. प्रकाश त्रिभुवन
ड. महात्मा फुले

'किरवंत' नाटकात एका ब्राह्मणाची कथा असूनही ते दलित रंगभूमीवरील नाटक का ठरते?

अ. लेखक दलित आहेत म्हणून
ब. नाटकात स्मशानाचे वर्णन आहे
क. किरवंत हा व्यवसाय करणारे ब्राह्मण बहिष्कृत असतात
ड. नाटकात अन्याय, उपेक्षेची वेदना, विद्रोह आहे

'कणसांचे मरणोत्सव' ही कविता कोणाच्या प्रश्नांवर प्रकाश टाकते?

अ. शेतकऱ्यांचे प्रश्न
ब. स्त्रियांचे प्रश्न
क. दलितांचे प्रश्न
ड. गरिबांचे प्रश्न

'सेनं सायी वेस' या शब्दांचा अर्थ काय आहे?

अ. लमाण समाजाची प्रार्थना
ब. साऱ्या जगाचे कल्याण कर ही प्रार्थना
क. शुभाशीर्वाद
ड. या शब्दांना काहीच अर्थ नाही

स्वातंत्र्योत्तर काळातील बेकारी, घर न मिळणे, अशांतता या समस्या सर्वप्रथम कोणी मराठी नाटकात मांडल्या?

अ. वि. वा. शिरवाडकर
ब. जयवंत दळवी
क. विजय तेंडुलकर
ड. मामा वरेरकर

सामाजिक आशयाची कविता सर्वप्रथम कोणत्या कवीने लिहिली?

अ. केशवसुत
ब. बालकवी
क. विंदा करंदीकर
ड. माधव ज्युलियन

'गोचाळलेल्या गावाचे अखेरचे गाणे' या शीर्षकातून कोणत्या अर्थाचे सूचन होते?

अ. गावाचे गावपण संपणे
ब. ग्रामीण जीवनातील प्रश्न
क. गावातील शेतीप्रधान जीवन
ड. गावातील अभावग्रस्तांचे जीवन

मराठीतील प्रायोगिक नाटके प्रामुख्याने कोणत्या रंगमंचावर सादर होत?

अ. छबिलदास शाळेचा रंगमंच
ब. शिवाजी मंदिर
क. दामोदर नाट्यगृह
ड. साहित्य संघ मंदिर

रेवती कोणाला 'चालते व्हा' म्हणते?

अ. केशव
ब. दिगंबरशास्त्री
क. ढबूशास्त्री
ड. वेदांतशास्त्री

'किरवंत' नाटकाचा शेवट काय सुचवतो?

अ. सिद्धेश्वराचा पराभव
ब. वासुदेवाच्या बंडखोरीचा पराभव
क. रेवतीचा पराभव
ड. मधूचा पराभव

कोणाच्या आईच्या अंत्यसंस्काराला सिद्धेश्वरशास्त्रींनी जाऊ नये असे वासुदेव सांगतो?

अ. ढबूशास्त्रींच्या
ब. केशवच्या
क. दिगंबरशास्त्रींच्या
ड. वेदांतशास्त्रींच्या

पाण्यासाठी वणवण भटकणाऱ्या, भुकेकंगाल असणाऱ्या माणसांची वेदना खालीलपैकी कोणत्या कवीच्या कवितेतून व्यक्त झाली आहे?

अ. इग्नेशिअस डायस
ब. रमझान मुल्ला
क. वीरा राठोड
ड. हेमंत दिवटे

दलित रंगभूमीवरील नाटकांचे प्रयोजन काय असते?

अ. सत्य, अहिंसेचा पुरस्कार

ब. स्वातंत्र्य, समता, बंधुतेचा पुरस्कार

क. दलितांची वेदना, विद्रोह, मानवता यांचे दर्शन

ड. हिंदुत्वाचा प्रचार

वेदना, विद्रोह व मानवता या मूल्यांचा पुरस्कार करणाऱ्या कवितेचा प्रवाह कोणता आहे?

अ. ग्रामीण साहित्य
ब. स्त्रीवादी साहित्य
क. दलित साहित्य
ड. महानगरी साहित्य

खालीलीपैकी कोणत्या कवीच्या कवितेतून महानगरातल्या माणसांच्या जगण्यातील अतर्क्यता व्यक्त झाली आहे?

अ. अरुण कोलटकर
ब. इंदिरा संत
क. पु. शि. रेगे
ड. माधव ज्युलियन

वासुदेव कोणत्या विचारसरणीच्या संस्थेत कार्यकर्ता आहे?

अ. फुले-आंबेडकरवादी
ब. गांधीवादी
क. हिंदुत्ववादी
ड. साम्यवादी

जातीने ब्राह्मण असूनही सिद्धेश्वरशास्त्रींच्या कुटुंबाची उपेक्षा का होते?

अ. वासुदेवाच्या भांडखोरपणामुळे
ब. सिद्धेश्वरांच्या स्वभावामुळे
क. किरवंताचा व्यवसाय समाजाने अपवित्र मानल्यामुळे
ड. दिगंबरशास्त्र्यांच्या दुष्टपणामुळे

ढबूशास्त्री कोणत्या संस्थेचे सभासद आहेत?

अ. मराठी विज्ञान परिषद
ब. मराठी व्यापार संघ
क. गोरक्षा सेवा संघ
ड. मुंबई मराठी साहित्य संघ

आभासी वास्तव व इलेक्ट्रॉनिक मिडियाची भाषा ही कोणत्या कवितेची वैशिष्ट्ये आहेत?

अ. साठोत्तरी
ब. नव्वदोत्तरी
क. स्वच्छंदवादी
ड. नवकविता

व्यावसायिक रंगभूमीला समांतर असणाऱ्या मराठीतील नाट्यचळवळीला कोणती रंगभूमी मिळाली?

अ. रविंद्रनाट्य मंदिर
ब. शिवाजी मंदिर
क. छबिलदास शाळेचा हॉल
ड. दामोदर नाट्यगृह

किरवंत असणाऱ्यांना जे दुःख भोगावे लागते त्यातून सुटण्याचा कोणता मार्ग वासुदेव सुचवतो?

अ. किरवंत नसणाऱ्या ब्राह्मणाच्या मुलीशी लग्न
ब. ब्राह्मणेतर मुलीशी लग्न
क. ब्रह्मचर्य
ड. किरवंताची सर्व घराणी निर्वंश करणे

ढबूशास्त्री वेदांतशास्त्रींच्या आईचे अंत्यसंस्कार का करत नाहीत?

अ. पैसे कमी मिळतील म्हणून
ब. सिद्धेश्वरशास्त्री रागावतील म्हणून
क. वासुदेव रागावेल म्हणून
ड. एकदा किरवंताचे काम केले की ते बहिष्कृत होतील म्हणून

नवकवितेचे जनक कोणाला म्हटले जाते?

अ. बा. सी. मर्ढेकर
ब. केशवसुत
क. अरुण कोलटकर
ड. दिलीप चित्रे

सिद्धेश्वर शास्त्र्यांना स्वप्नात कोण दिसते?

अ. ढबूशास्त्रींची आई
ब. दिगंबरशास्त्रींची पत्नी
क. वेदांतशास्त्रींची आई
ड. रेवती

ग्रामीण स्त्रीची वेदना खालीलपैकी कोणत्या कवयित्रीच्या कवितेतून व्यक्त झाली आहे?

अ. प्रज्ञा दया पवार
ब. सुजाता महाजन
क. कल्पना दुधाळ
ड. वीरा राठोड

वस्तूंचे मानवी जीवनावर होणारे आक्रमण हे आशयसूत्र खालीलपेकी कोणत्या कवितेतून दिसून येते?

अ. स्वगत एका अतिशहाण्या साबणाचं
ब. उजेडाच्या तिरडीवर
क. मनातल्या मनात चित्रं पाहताना
ड. किडक्या दातांचं सफरचंद

सरकारी योजनांच्या नावाखाली आदिवासी समाजाची होणारी फसवणूक खालीलपैकी कोणत्या कवितेतून व्यक्त होते?

अ. शाळेबद्दल
ब. तांडा
क. पूर्वपिठाचं दळणकांड
ड. अपरिहार्य मौन

भि. शि. शिंदे यांनी लिहिलेल्या कोणत्या नाटकाने दलित रंगभूमी गाजवली?

अ. युगयात्रा
ब. थांबा रामराज्य येतंय
क. काळोखाच्या गर्भात
ड. कोण म्हणतं टक्का दिला

टिळकांच्या घरी मधूला कशी वागणूक मिळते?

अ. सन्मानाची
ब. मित्रत्वाची
क. अस्पृश्यतेची
ड. बंधुतेची

कावळयांची शाळा, माणूस नावाचे बेट ही नव्या आशयाची वास्तववादी नाटके कोणी लिहिली आहेत?

अ. विष्णुदास भावे
ब. वि. वा. शिरवाडकर
क. विजय तेंडुलकर
ड. महेश एलकुंचवार

महानगरातील कामगारांचे अभावग्रस्त जगणे कोणत्या कवीच्या कवितेतून व्यक्त झाले आहे?

अ. नारायण सुर्वे
ब. नामदेव ढसाळ
क. विंदा करंदीकर
ड. शरच्चंद्र मुक्तिबोध

नाटकाच्या शेवटी वासुदेवाचा पराभव का होतो?

अ. सिद्धेश्वरशास्त्री वेदांतशास्त्रींकडे जातो
ब. वासुदेवाची हत्या होते
क. रेवती मधूला गरूड पुराण वाचावयास सांगते
ड. वासुदेवाची प्रेयसी त्याला फसवते

वर्तमानपत्रांतील घटनांचा माणसांवर काय परिणाम होतो आहे असे कवीला वाटते?

अ. माणसांना असुरक्षित वाटते
ब. माणसांना दुःख होते
क. माणसांना राग येतो
ड. आपल्याच माणसांबद्दल संशय वाटतो

भिडावं लागेल स्वतःशीच ही कविता काय सुचवू पाहते?

अ. स्त्रियांचे दुःख
ब. स्त्रियांचा विद्रोह
क. स्त्रियांनी स्वतःचा आतला आवाज ऐकला पाहिजे
ड. स्त्रियांची सहनशीलता

आदिवासी समाजाचे अस्थिर जगणे खालीलपैकी कोणत्या कवितेतून व्यक्त झाले आहे?

अ. शाळेबद्दल
ब. पूर्वपिठाचं दळणकांड
क. बिरसा मुंडा
ड. भिडावं लागेल स्वतःशीच

मानवी जीवनातील अनिश्चितता, मृत्यूची जाणीव खालीलपैकी कोणत्या कवितेतून व्यक्त झाली आहे?

अ. किडक्या दाताचं सफरचंद
ब. बेंबी नसलेला माणूस
क. ...आणि इथेही त्याची मारली जाते
ड. उजेडाच्या तिरडीवर

प्रेमानंद गज्वी यांच्या कोणत्या नाटकात वेठबिगारांची वेदना मांडली गेली आहे?

अ. घोटभर पाणी
ब. तणमाजोरी
क. जय जय रघुवीर समर्थ
ड. देवनगरी

'साकल्याचा प्रदेश' या काव्यसंग्रहातील कविता कोणत्या कारणाने आधुनिक ठरतात?

अ. समकालीन जगण्याचे चित्रण करतात
ब. प्रयोगशील लेखन
क. प्रतिमांचा वापर
ड. दुर्बोध भाषा

बापू थोरातांच्या अंत्यसंस्काराच्यावेळी शिंदे गणूशी कशाबद्दल बोलत असतो?

अ. बापूच्या अकाली निधनाबद्दल
ब. स्वतःच्या मुलाच्या लग्नाबद्दल
क. देवराव-खेमरावाच्या स्वार्थाबद्दल
ड. ढबूशास्त्र्याबद्दल

जागतिकिकरणाचा मानवी जीवनावर होणारा परिणाम खालीलपैकी कोणत्या कवितेतून व्यक्त झाला आहे?

अ. स्वच्छंदवादी कविता
ब. नवकविता
क. वास्तववादी कविता
ड. नव्वदोत्तरी कविता

मराठी रंगभूमीवर वास्तववादी नाटके कोणत्या संस्थमुळे सर्वप्रथम येऊ लागली?

अ. आय. एन. टी.
ब. साहित्यसंघ
क. अत्रे थिएटर्स
ड. नाट्यमन्वंतर

वासुदेवाने कोणाशी लग्न करावे असे सिद्धेश्वराला वाटते?

अ. जगतापाच्या मुलीशी
ब. रेवतीच्या बहिणीशी
क. शिंदेच्या मुलीशी
ड. थोरातांच्या बहिणीशी

सिद्धेश्वर शास्त्री भ्रमिष्ट को होतो?

अ. रेवतीच्या वागण्याचा परिणाम म्हणून
ब. द्विधा मनःस्थिती झाल्याने
क. ढबूशास्त्री आपला व्यवसाय घेईल या भयाने
ड. बापू थोराताच्या भूताच्या भयाने

'कणसांचे मरणोत्सव' ही कविता कोणाची आहे?

अ. वीरा राठोड
ब. प्रज्ञा दया पवार
क. कल्पना दुधाळ
ड. सुजाता महाजन

आधुनिक काळात 'स्व' ची ओळख हरवलेला माणूस या अर्थाचे सूचन खालीलपैकी कोणत्या प्रतिमेतून होते?

अ. प्रतिकुलतेच्या टायरखाली चिरडताना
ब. बेंबी नसलेला माणूस
क. किडक्या दाताचं सफरचंद
ड. कल्चरल शॉक

ढबूशास्त्र्यांना मधूने कोणता ग्रंथ वाचू नये असे वाटते?

अ. गरूड पुराण
ब. गुरुचरित्र
क. ज्ञानेश्वरी
ड. भागवत

बंजारा समाज आजही परिवर्तनाच्या प्रतिक्षेत आहे ही जाणीव खालीलपैकी कोणत्या कवितेतून व्यक्त झाली आहे?

अ. मोक्ष
ब. तांडा
क. वर्तमानपत्र
ड. जळू

ढबूशास्त्र्याला सिद्धेश्वरशास्त्री त्याच्या पोटावर पाय देतो असे का वाटते?

अ. कारण सिद्धेश्वरशास्त्री वेदांतशास्त्रींकडे अंत्यकर्माला जात नाही.
ब. कारण मधू गरूड पुराण वाचत नाही.
क. कारण वासुदेव ब्राह्मणेतर मुलीशी लग्न ठरवतो.
ड. कारण सिद्धेश्वरशास्त्री जगतापाच्या मुलीची पत्रिका पाहतो

दलित रंगभूमीवरील नाटके प्रामुख्याने कोणता प्रत्यय देतात?

अ. दलितांबद्दल चीड
ब. दलितांच्या वेदनेची जाणीव
क. ब्राह्मणांवरील अन्यायाची चीड
ड. मराठ्यांबद्दल अभिमान

'किरवंत' हा व्यवसाय करणाऱ्या ब्राह्मणाला प्रामुख्याने कोणत्या प्रदेशात वाईट वागणूक मिळते?

अ. बिहार
ब. कोकण
क. विदर्भ
ड. मराठवाडा

'प्रतिकुलतेच्या टायरखाली चिरडताना' या कवितेतून कोणत्या अर्थाचे सूचन होते?

अ. कवीचे खडतर बालपण
ब. कवीचे तारुण्यसुलभ अनुभव
क. सामाजिक प्रश्न
ड. मानवी जीवनातील असुरक्षितता

संजय पवार यांनी लिहिलेले दलित रंगभूमीवरील नाटक खालीलपैकी कोणते आहे?

अ. मन्वंतर
ब. कोण म्हणतं टक्का दिला
क. घोटभर पाणी
ड. बामणवाडा

कवितेचे पारंपरिक संकेत मोडून नवा आशय व नव्या प्रतिमा मराठी कवितेत कोणी आणल्या?

अ. शरच्चंद्र मुक्तिबोध
ब. विंदा करंदीकर
क. बा. सी. मर्ढेकर
ड. नारायण सुर्वे

कल्पना दुधाळ यांच्यामते ग्लोबल एरिया नेटवर्कमध्ये कव्हरेज क्षेत्राच्या बाहेर कोण फेकले गेले आहे?

अ. आदिवासी
ब. शेतकरी
क. लमाण
ड. बंजारा

रेवती वासुदेवाला कोणती जाणीव करून देते?

अ. वासुदेवाला लहानपणापासून तिने वाढवल्याची
ब. घरच्या दारिद्र्याची
क. बायको अन्य जातीची केली तरी त्याचे किरवंत असणे संपणार नाही याची
ड. त्याने लग्न करणे आवश्यक आहे याची

---------------------------------------------------------------------------------------------------------------